फिर्यादी प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** मनाठा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0195 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/10/2026 17:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 13/08/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 13/08/2026

**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/10/2026 **Time (वेळ):** 16:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/10/2026 16:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पो स्टे मनाठा येथे ,हदगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रसुल बशीरसाब तांबोळी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभा,नांदेड,मनाठा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभा,नांदेड,मनाठा,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9987335769

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक दाडे | | | 1. मनाठा,हदगांव,मनाठा,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 12/10/2026

मी रसुल बशीरसाब तांबोळी, वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड, ता.जि.नांदेड, मोबाईल क्रमांक 9987335769
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिनांक 09/06/2025 पासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.
आम्ही दिनांक 13/08/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना श्री राहुल तरकसे, प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार नामे शिवम विरेद्रप्रसाद जैस्वाल, वय 28, व्यवसाय व्यापार रा. मनाठा ता. हदगाव जि. नांदेड यांची लेखी तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत तोंडी आदेशित केले होते.
त्यावरून आम्ही तक्रारदार शिवम विरेद्रप्रसाद जैस्वाल यांना आमचे कक्षात घेवुन येवुन विचारणा केली की, त्यावेळी तक्रारदार शिवम जैस्वाल यांनी सांगितले की, दिनांक 12/08/2026 रोजी सायंकाळी 06:00 वाजताचे सुमारास मी व माझे मित्र असे मनाठा पाटीजवळ 52 पत्याची रम्मी गेम खेळत असतांना पोलीस स्टेशन मनाठा येथील अशोक दाडे साहेब, रावळे साहेब, भोपाळकर साहेब व त्याचे सोबत पाच होमगार्ड असे आमच्याजवळ येवून आम्हाला ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन मनाठा येथे घेवुन गेले. तेथे आमच्यावर गुन्हा दाखल करून रात्री 10:00 वाजता आम्हास नोटीसवर सोडून दिले. त्यावेळी माझे ताब्यातून घेतलेली माझ्या मित्राची मोटार सायकल क्र. एम.एच. 26 बी.जे. 1990 फॅशन प्रो ही परत देण्याकरीता आमचे बिट जमादार अशोक दाडे साहेब यांना विनंती केली असता, त्यांनी मला 5,000/- रूपये देवून मोटार सायकल घेवून जाण्यास सांगितले. बिट जमादार अशोक दाडे साहेब जे 5,000/- रूपये मागत आहेत ती मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची माझी खात्री झाली आहे. परंतु मला त्यास लाच देण्याची इच्छा नाही.
माझे व बिट जमादार अशोक दाडे साहेब यांच्यामध्ये कोणताही आर्थिक व्यवहार, वैर किंवा दुष्मनी नाही. तरी बिट जमादार अशोक दाडे साहेब हे माझे मित्राची मी नेलेली मोटार सायकल परत देण्याकरीता लाचेची मागणी करीत आहे. बिट जमादार अशोक दाडे साहेब यांनी स्वतः किंवा इतरामार्फत लाच मागणी केल्यास किंवा लाच स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे. वगैरे मजकुराची लेखी दिली होती.
त्यानंतर श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांनी पुढील गोपनिय कामाकरीता तहसिल कार्यालय, नांदेड यांना जा.क्र. 2371/2026 प्रमाणे पत्रक देवून तेथील दोन शासकीय कर्मचारी पंच क्रमांक 1. श्री संदिप दयानंद केंद्रे, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद ग्राम महसुल अधिकारी, नेमणुक तहसिल कार्यालय, नांदेड व पंच क्रमांक 2. श्री बालाजी बाबुराव केंद्रे, वय 35 वर्षे,व्यवसाय नोकरी,पद ग्राम महसुल अधिकारी, नेमणुक तहसिल कार्यालय, नांदेड असे कर्मचारी उपलब्ध करून दिले होते. त्याप्रमाणे ला.प्र.वि. नांदेड युनिट येथे सदरचे दोन पंच आमचे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांची एकमेकांची ओळख करून दिली होती. तक्रारदार यांनी त्याची दोन्ही पचासमक्ष तोंडी तक्रार कथन केली होती. त्यानंतर त्यांची लेखी तक्रार आम्ही पंचांना वाचण्यास दिली होती. त्यावरून तक्रारदार यांनी तोंडी कथन केलेली तक्रार व लेखी तक्रार एकसारखी असल्याची खात्री करून त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली होती.
त्यानंतर आम्ही व सापळा कार्यवाहीतील सदस्य पोलीस अंमलदार पोहेकाँ/वच्चेवार, पोहेकाँ/मेकाले, पोकाँ/शिवानन रापतवार चापोहेकाँ/मामुलवार असे सापळा कार्यवाही करीता लागणारे आवश्यक साहित्य घेवून शासकीय वाहन क्रमांक एम.एच. 26 आर 0657 ने वेळ 15:36 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट येथून रवाना होवून मनाठा गावचे अलिकडे मौजे कुर्तडी गावचे शिवारात 16:27 वाजता सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलो होतो.
त्यानंतर तक्रारदार शिवम जैस्वाल हे त्याच्या चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. 26 सी.पी. 5564 ने सापळा पथक

थांबलेल्या ठिकाणी हजर आले होते. त्यानंतर आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस अंमलदार रापतवार यांनी ध्वनिमुद्रीत केले होते.

त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार जैस्वाल यांचेसोबत पंच क्रमांक 1. संदिप केंद्रे यांना लोकसेवक अशोक दाडे यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणापासुन 17:00 वाजता पोलीस स्टेशन मनाठा येथे रवाना केले होते. त्यानंतर 17:31 वाजताचे सुमारास तक्रारदार जैस्वाल व पंच क्र. 1 संदिप केंद्रे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले होते. तेव्हा तक्रारदार यांच्या गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पोलीस अंमलदार रापतवार यांनी बंद करून आमचे ताब्यात दिले होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार जैस्वाल यांना बाजुस थांबण्यास सांगुन पंच क्र. 1 संदिप केंद्रे यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली की, तुम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणाहुन रवाना होवुन व परत येई पर्यन्त काय घटना घडली असे असे विचारले असता, त्यावर पंच क्र. 1 संदिप केंद्रे यांनी असे सांगितले होते की, आम्ही दोघे पोलीस स्टेशन मनाठा येथे गेलो होतो. तेथे लोकसेवक अशोक दाडे यांची प्रत्यक्ष भेट झाली होती. तेव्हा लोकसेवक यांनी माझे विषयी विचारपूस करून मला बाहेर थांबण्यास सांगितल्याने मी पोलीस स्टेशनच्या अवारात थांबुन राहिलो होतो. थोडयाच वेळाने तक्रारदार जैस्वाल हे बाहेर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो होतो.

त्यानंतर आम्ही तक्रारदार जैस्वाल यांना पंच क्रमांक 1 व 2 यांचे समक्ष काय घटना घडली असे विचारले असता, त्यावर तक्रारदार यांनी असे सांगितले होते की, मी व पंच क्रमांक 1 असे लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पोलीस स्टेशन मनाठा येथे गेलो होतो. तेथे लोकसेवक दाडे यांची समक्ष भेट झाली होती. प्रत्यक्ष भेटी दरम्यान मी लोकसेवक यांना "नमस्कार दाडे साहेब, काय चाललयं सर, चला सर, दयानं ओ, गाडी दयानं ती, असे म्हणालो असता, त्यावर लोकसेवक यांनी देवून टाकूत त्याला काय? खर्चा काही नाही असे म्हणुन पंच क्रमांक 1 यांचे विशयी विचारणा करून त्यांना बाहेर थांबण्यास सांगितले होते. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे गाडीचे कागदपत्र, आधार कार्डची मागणी केली होती. त्यावर मी ठिक आहे चालते, देतो आणुन, असे म्हणताच त्यावर लोकसेवक यांनी जास्त काही नाही सगळ्या बरोबर असे म्हणाल्याने, त्यावर मी पाच हजार, पाच हजार जास्त व्हायलेत ना सर, मी देतो बरोबर, पाच हजार जास्त व्हायलेत न सर, येता सर मी, भेटतो एका तासात, असे म्हणुन मी व पंच क्रमांक 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो होतो. अशी हकीकत तक्रारदार यांनी कथन केली होती.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व लोकसेवक अशोक दाडे यांच्या प्रत्यक्ष भेटीदरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, त्यात लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे गाडीच्या कामासंबंधाने बोलुन देवून टाकूत, त्याला काय, खर्चा काही नाही, हिषोबानं गाडी, मला खर्च, सगळ्या बरोबर असे तक्रारदारास म्हणाले असता, त्यावर तक्रारदार जैस्वाल यांनी पाच हजार, चार हजार असे म्हणाल्याने त्यावर लोकसेवक यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे तक्रारदारास लोकसेवक अषोक दाडे याची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांचे गाडीचे आवश्यक कागदपत्रासह दिनांक 14/08/2026 रोजी पाठविण्याचा निर्णय घेवुन दिनांक 13/08/2026 रोजीची कार्यवाही सर्वानुमत्ते स्थगित केली होती.

त्यानंतर दिनांक 14/08/2026 रोजी तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन पंच बालाजी केंद्रे यांना सोबत देवुन पोलीस स्टेशन मनाठा येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात आली. सदर दिवशी लोकसेवक दाडे हे औरंगाबाद येथे गेले असल्यामुळे त्यांची भेट झाली नाही. तसेच ठाणे प्रभारी अधिकारी यांनी देखील तक्रारदार यांना लोकसेवक अशोक दाडे आल्यानंतर मोटार सायकल मिळेल असे सांगीतले. त्यामुळे सदर दिवशीची कार्यवाही स्थगीत करुन लोकसेवक पोलीस स्टेशन येथे हजर आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

दिनांक 27/08/2026 रोजी पर्यंत तक्रारदार यांनी आम्हा संपर्क केला नाही. त्यामुळे आम्ही दिनांक 27/08/2026 रोजी सापळा पथकासह ला.प्र.वि.नांदेड कार्यालय येथुन रवाना होवुन तक्रारदार यांचे गावा जवळील कुर्तडी गावाच्या शिवारात पोहचुन सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोह राजेश राठोड यांना तक्रारदार यांचे गावात पाठवुन तक्रारदार यांचा शोध घेवुन त्यांना सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येवुन येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे पोह राजेश राठोड यांनी तक्रारदार यांचे मनाठा गावात जावुन त्यांचा शोध घेवुन त्यांना सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी घेवुन आले. तेव्हा तक्रारदार यांना पुढील कार्यवाही कामी आमचे सोबत संपर्क का केला नाही या बाबत विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगीतले की, त्यांचा दिनांक 15/08/2026 रोजी मोटार सायकलवर पडुन अपघात झाला होता. त्यामुळे त्यांनी आम्हास संपर्क केला नसल्याचे कळविले. त्यामुळे आम्ही तक्रारदार यांचे म्हणणे प्रमाणे त्यांनी आम्हास पुन्हा संपर्क करुन बोलावल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. दिनांक 31/08/2026 रोजी आम्ही तक्रारदार जैस्वाल यांना त्यांच्या मोबाईल क्रमांक 9527269196 वर संपर्क करुन

आम्ही सापळा पथकासह पुढील कार्यवाही कामी येणार असल्याचे कळवुन त्यांना सापळा पथकास नियोजित ठिकाणी येवुन भेटण्यास सांगीतले. तसेच आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक ला.प्र.वि.नांदेड येथुन रवाना होवुन मनाठा गावचे अलिकडे मौजे कुर्तडी गावचे शिवारात जावुन तक्रारदार यांची भेट घेतली.
तेव्हा तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, लोकसेवक अशोक दाडे यांना माझ्यावर काहीतरी संशंय आला आहे. त्यामुळे मी त्यांचेकडे गेल्यास ते आता माझ्याकडे पैशाची मागणी करणार नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही स्थगीत करादी, असे तक्रारदार यांनी सांगीतले. तक्रारदार यांचे म्हणणे प्रमाणे त्यांचा सविस्तर जबाब नोंदवुन घेवुन सदर कार्यवाही स्थगीत करण्यात आली होती.
त्यानंतर सदरील लाचमागणी पडताळणी अनुशंगाने दिनांक 04/09/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड जा.क्र. 2614/2026 अन्वये मा. पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांच्या मार्फतीने सापळा कार्यवाही बाबत सविस्तर अहवाल सादर केला.
मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र, नांदेड कार्यालयाकडुन अहवालाचे अवलोकन करुन प्रस्तुत प्रकरणात ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण पुनःश्च ऐकुण स्क्रीप्ट तयार करण्याची सुचना केली. मा.वरिष्ठ कार्यालयाचे सुचनेप्रमाणे नमुद सापळा कार्यवाही दरम्यान आमचे कार्यालयातील संगणकात सुरक्षित असलेली ऑडिओ क्लिप स्लोमोशन मध्ये पुनःश्च लक्षपुर्वक ऐकुण स्क्रीप्ट तयार करण्यात आली. तेव्हा आमचे लक्षात आले की, दिनांक 13/08/2026 रोजी च्या लाच मागणी, पडताळणी, सापळा पुर्व, सापळा कार्यवाही व घटनास्थळ पंचनामा पान क्र.12/20 वरील तक्रारदार यांचे वाक्य किती ओ च्या नंतर हाळु आवाजात पा..हा...च.. असे म्हणत असल्याचे आढळुन आले आहे. सदर कार्यवाही मध्ये लोकसेवक यांचेकडुन तक्रारदर यांना हाळु आवाजात लाचेची मागणी केली असल्याचे आढळुन येत असल्याने आम्ही पुढील कार्यवाही कामी सदर कार्यवाही मधील दोन्ही पंचास दिनांक 07/10/2026 रोजी पत्र देवुन ला.प्र.वि.कार्यालय येथे बोलवुन घेतले. तसेच तक्रारदार यांना देखील दिनांक 08/10/2026 रोजी आमचे कार्यालयात हजर राहण्याची सुचना दिली.
त्यानंतर दिनांक 08/10/2026 रोजी आमचे सुचने प्रमाणे दोन्ही पंच व तक्रारदार ला.प्र.वि.कार्यालय येथे हजर आले. त्यानंतर दोन्ही पंच व तक्रारदार यांना दिनांक 31/08/2026 रोजी सिलबंद करण्यात आलेले मेमरी कार्ड उघडुन पुनःश्च एकदा तक्रारदार व लोकसेवक यांच्यात दिनांक 13/08/2026 रोजीच्या भेटी दरम्यान झालेले संभाषण ऐकण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच सदरील कार्यवाही का करण्यात येणार आहे, या बाबत सविस्तर माहिती दिली.
त्यानंतर वेळ 11:30 ते 12:00 वाजताचे दरम्यान दिनांक 31/08/2026 रोजीचे लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान सिलबंद करण्यात आलेले मुळ मेमरी कार्ड हे सुरक्षित असल्याची दोन्ही पंचाची खात्री करुन दिली. त्यानंतर सदरील सिलबंद लिफाफा दोन्ही पंचासमक्ष उघडण्यात आला. आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचाचे समक्ष दिनांक 13/08/2026 रोजी लोकसेवक व तक्रारदार यांच्यात डिजीटल व्हॉईस रेकॉडरमध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण लक्षपूर्वक ऐकले आले. तेव्हा यातील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटीतील संभाषण दरम्यान त्यांचे कामाचे अनुशंगाने बोलून तक्रारदार यांच्याकडे मोटार सायकल परत करण्यासाठी बॉन्ड पेपर, गाडीचे कागदपत्र, आधारकार्ड व फोटो असे कागदपत्राची मागणी केली. त्यावेळी लोकसेवक हे मग असे तक्रारदार जैस्वाल यांना म्हणाले, त्यानंतर तक्रारदार हे काढा असे म्हणल्यावर लोकसेवक दाडे यांनी जास्त काही नाही, सगळयांच्या बरोबरचं असे म्हणाले तेव्हा तक्रारदार यांनी किती? पाच हजार, पाच हजार जास्त व्हायलेत ना सर असे म्हणाले. तेव्हा लोकसेवक मला खर्च असे म्हणल्यावर तक्रारदार म्हणाले मी देतो बरोबर त्यानंतर लोकसेवक म्हणाले सांगा ना आपली गोष्ट, सांगतो माघारी काही नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा लोकसेवक यांना किती ओ? असे म्हणून विचारणा केली. तेव्हा लोकसेवक दाडे यांनी हळु आवाजात पा...ह...च... असे म्हणून तक्रारदार यांच्या लाचेच्या रक्कमेच्या बोलणीच्या संदर्भास प्रतिसाद देवुन तक्रारदार यांचेकडे पाच हजार रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर आम्ही सदर मेमरी कार्डची हॅश व्हॅल्यु काढुन सदरचे SanDisk कंपनीचे Micro SD HC I 8 GB 5332DTCFDOXU BI MADE IN CHINA असे असलेले मेमरी कॉर्ड दोन शासकीय पंचा समक्ष दिनांक 08/10/2026 रोजी 12:15 ते 16:30 वाजताच्या दरम्यान एका कागदी लिफाफात टाकुन लाख मोहर सिल बंद करुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात घेतले आहे.
तसेच प्रस्तुत प्रकरणात मा.वरिष्ठाच्याकडे मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनात मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, ला.प्र. वि.नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे आदेश जा.क्र.3205/2026 दिनांक 05/10/2026 अन्वये सदर लाचमागणी पडताळणी कार्यवाही मध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट दिसुन येत असल्याने सदर प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करणे बाबत आदेशीत करण्यात आले

आहे.
तरी सदर सापळा कार्यवाहीतील लोकसेवक अशोक दाडे, नेमणुक पोलीस स्टेशन मनाठा, जि.नांदेड यांनी तक्रारदार शिवम जैस्वाल यांचे विरुध्द करण्यात आलेल्या कार्यवाही दरम्यान ताब्यात घेण्यात आलेली मोटार सायकल परत देण्यासाठी त्यांना मिळणा-या कायदेशिर परिश्रमाखेरीज 5000/- रुपये लाचेची मागणी करुन गुन्हा केला आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Vilas sudhamrao Chauli(I (Inspector)) / CPF15101000402VSCM8801X

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **No.**(क्र.): **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Vilas sudhamrao Ch

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** CPF15101000402VSCM

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

मनाठा पोलीस ठाणे
नांदेड